"महाराष्ट्रातील मंगल कार्यालयांच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास - विशेष संदर्भ सांगली जिल्हा"

<u>संशोधन आराखडा</u>

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्य विद्याशाखे अंतर्गत वाणिज्य विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर करावयाचा पूर्व संशोधन आराखडा

<u>संशोधक</u>

श्री विनायक शामराव पाटील

एम. कॉम., एम.बी. ए., सेट

मोबाईल नंबर- ८२०८३९६९४१

ईमेल - vspatil888@gmail.com

<u>मार्गदर्शक</u>

डॉ. गणेश नारायण बोकारे

वाणिज्य विभाग प्रमुख

नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औढा, जि. हिंगोली

<u>अभ्यास केंद्र</u>

कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

२०२१-२२

❖ प्रस्तावना

आपला भारत देश हा हिमालया पासून कन्याकुमारी पर्यंत व अरबी समुद्रा पासून ते आसाम मेघालया पर्यंत पसरला आहे. यामध्ये अनेक धर्म , जात, पंथाचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. राजकीय व प्रशासकीय सोयीसाठी भारतात अनेक राज्य आहेत. या प्रत्येक राज्याची भाषा , संस्कृती, परंपरा, रूढी या स्वतंत्र आहेत. त्यामुळेच भारत हा विविधतेने नटलेला सुंदर असा देश आहे.

भारतात जे अनेक धर्म, जाती, पोटजाती, पंथाचे लोक राहतात त्यांच्या सर्व परंपरा, संस्कृती व रूढी वेगवेगळ्या आहेत. परंतु या सर्व विविधतेत सुद्धा एकता बघायला मिळते. ज्यामध्ये कुटुंब संस्था व कुटुंब व्यवस्था पाहायला मिळते. जगात एकत्र कुटुंब ही संकल्पना फार कमी ठिकाणी पाहायला मिळते पण भारतात मात्र सर्वच राज्यांमध्ये एकत्र कुटुंब व्यवस्था पहायला मिळते.

भारतात अनेक सण समारंभ सुद्धा मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. प्रत्येक धर्मानुसार असणारे सण हे वेगवेगळे जरी असले तरी सुद्धा सर्व धर्मीय लोक एकत्र येऊन हे सण खूप चांगल्या प्रकारे साजरे करतात. उदा. गणेशोत्सव , रमजान, दिवाळी, ख्रिसमस इ. या सणांमध्ये सर्व कुटुंबीय एकत्र येतात व आनंदाने हे सण साजरे करतात.

सर्व जगात लग्न ही थोड्या काळासाठी असणारी गोष्ट आहे पण भारतात मात्र लग्न हे माणसाच्या आयुष्यातील एक मोठे व साधारणपणे एकदाच होणारे कार्य आहे. त्यामुळे त्यावरती भारतीय लोक जास्त लक्ष देतात. भारतात या कुटुंब संस्था व लग्न व्यवस्थेला फार पूर्वीपासून खूप महत्त्व असल्याने लग्न हे एखाद्या मोठ्या सणाचे सारखे साजरे केले जाते. पूर्वीच्या काळात जी लग्नं व्हायची ती पाच दिवसापर्यंत चालत असत. सर्व कुटुंबातील पै- पाहुणे , नातेवाईक व आप्तेष्ट अशा सर्वांना यासाठी आमंत्रणे पाठवली जात. पूर्ण पाच दिवस वेगवेगळे कार्यक्रम केले जात असत. लोकांना येण्यासाठी वाहतुकीची साधनं कमी होती. वाहतुकीसाठी लागणारा वेळ खूप होता. सत्कार , मानपान करणे यासाठी घरातील अनेक लोक असत. घरासमोर मोठं अंगण असे. त्यात मोठा मंडप घालून अशी मोठी लग्न साजरी केली जात असत.

आजच्या आधुनिक काळात मात्र कुटुंबे लहान होत आहेत. घराचे आकार लहान होत आहेत. लोकांकडे असणारा वेळ कमी झाला आहे. घरासमोरील अंगण नाहीसे झाले आहे. त्यामुळे घरातील

कार्यक्रम साजरे करण्यासाठी जागा राहिलेली नाही. अशा अनेक कारणामुळे पूर्वीची जी लग्न घराच्या अंगणात होत होती ती करण्यासाठी सोयीचे ठिकाण बघितले जाऊ लागले. त्यामुळे सर्वच्या सर्व सोयी एकाच हाताखाली मिळतील व त्या सुद्धा कमी खर्चात व कमी कष्टात हे पाहिले जाऊ लागले. यातूनच मंगल कार्यालय ही संकल्पना अस्तित्वात आली व लोकांना ती खूपच आवडली. पूर्वीची पाच दिवसांची लग्न आता फक्त एका दिवसावर आली व आजच्या धावपळीच्या काळात तर ती काही तासांवर आली आहेत. सर्व पाहुणे कार्यालयातच येतात व तिथूनच आपल्या घरी परततात. त्यामुळे छोट्या घरांमध्ये सुद्धा अडचण होत नाही. राहण्याची सोय कोठे करावी याचा प्रश्न उरत नाही. त्यामुळे या मंगल कार्यालयांचा उद्योग मोठ्या प्रमाणात सुरू झाला.

पूर्वी या कार्यालयांवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या कमी होती. पण आजच्या काळात मात्र या लोकांची संख्या खूप वाढली आहे. उदा. आचारी व त्याच्याकडच्या कामाच्या बायका व वाढपी मुले, डेकोरेटर व त्याचे कामगार , वाजंत्री बँजो, डोली, घोडा, वादक, गायक, संगीतकार असे अनेक लोक आज या कार्यालयावर अवलंबून आहेत. त्यामुळे मंगल कार्यालय हा एक मोठा उद्योग म्हणून आज समोर येत आहे.

आज पुणे मुंबई सारख्या मोठ्या शहरांमध्ये या कार्यालयांचे प्रस्थ खूपच मोठे आहे. काही लाखात या कार्यालयांचे भाडे एकाच कार्यक्रमासाठी असते. अशा मोठ्या शहरां बरोबरच आता ग्रामीण भागातही हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर जोर धरू लागला आहे. यामुळेच या ठिकाणच्या कार्यालयांचे भाडे देखील आता काही हजारांपासून लाखांच्या जवळपास येऊ लागले आहे. त्यामुळे हे क्षेत्र जरी असंघटित असले तरी सुद्धा यामध्ये अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या व होणारी उलाढाल ही मोठी असल्याने या कार्यालयांच्या उत्पन्नाचा अभ्यास हा या संशोधनाचा विषय म्हणून घेतला आहे.

महाराष्ट्र हा देशात पूर्वीपासूनच संस्कृती, राजकीय, आर्थिक, कला व क्रीडा अशा प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर राहिला आहे. मराठमोळ्या परंपरा व संस्कृती ही पहिल्यापासूनच खूप चांगल्या पद्धतीने विज्ञानाची सांगड घालून बनवण्यात आले आहे. अनेक नद्या व धरणे यामुळे शेतीही पहिल्यापासूनच समृद्ध राहिली आहे. त्याचबरोबर ज्या ठिकाणी पाणी पोहोचत नाही त्या ठिकाणीही मानवनिर्मित

कालव्यांद्वारे पाणी पुरवून त्या ठिकाणांचाही विकास मोठ्या प्रमाणावर केला आहे. मुंबई ही तर पहिल्यापासूनच संपूर्ण महाराष्ट्राची आर्थिक राजधानी राहिली आहे. म्हणजेच पूर्ण महाराष्ट्र हा देशात आर्थिक बाबतीतही पूर्वीपासूनच अग्रेसर आहे. या सर्वांमुळे या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांची संख्या , प्रत्येक कुटुंबातील वेगवेगळे कार्यक्रम उदा. साखरपुडा , लग्न, डोहाळ जेवण, बारसे, जावळ, मुलांचे व लग्नाचे वाढदिवस, एकसष्ठी व पंच्याहत्तरी इ. अशा सर्व वयाच्या लोकांच्या कार्यक्रमांची संख्या खूप मोठी आहे. या कार्यक्रमांना आपल्या घरी पाहुण्यांना बोलावणे आणि जेवायला घालणे ही सर्वांची आवडती गोष्ट आहे. त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात कार्यालयांची निर्मिती झाली आहे. पूर्ण महाराष्ट्रात सुद्धा पश्चिम महाराष्ट्र हा यातील सर्वच गोष्टीत अग्रेसर आहे. त्यामुळे संपूर्ण सांगली जिल्हा हा या अभ्यासाचा भाग म्हणून प्रातिनिधिक स्वरूपात घेतला आहे.

❖ संशोधन साहित्याचा आढावा

मंगल कार्यालये हे आजपर्यंत असंघटित असे क्षेत्र राहिलेले आहे . मोठ्या प्रमाणात उलाढाल होत असली तरीसुद्धा यावरती संशोधन अभ्यास आज पर्यंत झालेला आहे. त्यामुळे मंगल कार्यालयांवरील कोणतेही संदर्भ या ठिकाणी दिसत नाही. परंतु वेगवेगळ्या क्षेत्रातील आर्थिक उत्पन्नाचा अभ्यास केलेल्या संशोधनांचा या ठिकाणी संदर्भ म्हणून वापर करत आहे.

१) **प्रा. एकनाथ ज. हेलगे (२००६)** - प्रा. हेलगे यांनी अमरावती महसूल विभागातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक कार्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन (वर्ष १९९०-९१ ते २०००-०१) या विषयावर अभ्यास केला आहे. यासाठी त्यांनी अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ या ४ जिल्ह्यांचा अभ्यास केला आहे. यासाठी त्यांनी या विभागातील सहकारी पतसंस्थांची संख्या, त्यांची सभासद संख्या, भाग भांडवल, खेळते भांडवल, ठेवी, कर्ज वाटप व वसुली, कर्ज थकबाकी,राखीव व इतर निधी अशा वेगवेगळ्या आधाराचा वापर करून या पतसंस्थांचा अभ्यास केला आहे. तसेच कर्जाचे वाटप, योग्य लाभार्थ्यांची निवड, योग्य तारण, योग्य कारण, घेतलेल्या कर्जाचा त्याच कारणासाठी वापर व योग्य प्रकारे वसुली अशा प्रकारच्या शिफारशी या अभ्यास मधून केलेल्या आहेत.

२) **जयंत म. काळे (२००६)** - प्रा. काळे यांनी 'अकोला शासकीय दुध योजनेअंतर्गत येणाऱ्या सहकारी दुध उत्पादक संस्थांच्या आर्थिक स्थितीचे व विपणनाचे विश्लेषणात्मक अध्ययन (१९९१-९२ ते २०००-०१)' या विषयावर अभ्यास केला आहे.यासाठी त्यांनी अकोला शासकीय दुध योजना, दुध उत्पादक, योजनेचे ग्राहक व विक्रेते या वेगवेगळ्या घटकांचा अभ्यास केला आहे. यामध्ये त्यांनी दररोजचे दुधाचे होणारे संकलन, दुध वाढीचे संस्थांचे प्रयत्न, संस्थांची आर्थिक स्थिती, सभासदांना प्राथमिक सुविधा, संस्थातील स्पर्धा, राजकीय हस्तक्षेप, दुधातील भेसळ, प्रशिक्षणाचा अभाव, भांडवलाची कमतरता व इतर अशा अनेक कारणांचा दुध संकलन संस्थांच्या उत्पन्नावरील परिणामाचा अभ्यास केला आहे व यातून बाहेर येण्याच्या शिफारशी मांडल्या आहेत.

❖ संशोधनाची उद्दिष्टे

१) सांगली जिल्ह्यातील कार्यालय मालकांच्या मागील दहा वर्षांच्या उत्पन्नाचा अभ्यास करणे.

२) कार्यालय मालकांनी उत्पन्न वाढवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

३) कार्यालयांच्या उत्पन्नावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

❖ समस्या विधान

स्पर्धा व इतर कारणांमुळे कार्यालय मालकांच्या उत्पन्नावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे.

❖ संशोधन गृहीतके

१) कार्यालयांमध्ये होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये वाढ झाली आहे.

२) स्पर्धेमुळे व इतर कारणांमुळे कार्यालयांच्या उत्पन्नावर परिणाम झाला आहे.

❖ संशोधन व्याप्ती

महाराष्ट्र हा पूर्वीपासूनच शेती व व्यापारी दृष्टीने सधन आहे. पश्चिम महाराष्ट्र व त्यातही सांगली जिल्हा हातर पहिल्यापासूनच आर्थिक दृष्ट्या फार सधन राहिला आहे. त्यामुळे घरचे सर्व कार्यक्रम मोठ्याने साजरे करणे , अनेक लोकांना आमंत्रण देणे , लग्नात डोली, घोडा, वाजंत्री, बँजो व

डॉल्बी यांचा वापर प्रतिष्ठा दाखवण्यासाठी पूर्वीपासूनच केला जात आहे. त्यामुळे या ठिकाणी कार्यालयांची संख्या सुद्धा मोठी आहे. सांगलीत एकूण दहा तालुके आहेत व प्रत्येक तालुक्यात सरासरी १०० ते २०० छोटी मोठी कार्यालय आहेत. प्रत्येक कार्यालयात वर्षाला साधारणपणे ३० ते १५० कार्यक्रम होतात. १० ,०००/- ते १ ,५०,०००/- असे या कार्यालयांचे भाडे आहेत. याबरोबरच जेवण व इतर सोयी पुरवण्यासाठी ही खूप मोठी आर्थिक उलाढाल होत असते. त्यामुळे जिल्हा व यातील दहा तालुक्यांमधील कार्यालयांचा अभ्यास ही व्याप्ती अभ्यासासाठी घेतली आहे या अभ्यासाठी २०१३-१४ ते २०२२-२३ या दहा वर्षांचा कालावधी निवडला आहे.

❖ संशोधन अभ्यास मर्यादा

१) संशोधनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील कार्यालयांचा अभ्यास करणे शक्य नसल्याने प्राथमिक स्वरूपात सांगली जिल्ह्याचे क्षेत्र फक्त निवडले आहे.

२) कार्यालयांचे उत्पन्न इतक्याच विषयावरती हे संशोधन आहे.

३) संशोधनासाठी १० वर्षांचा कालावधी घेतला .

४) जिल्ह्यातील सर्व कार्यालयांचा अभ्यास करणे शक्य नसल्याने प्रत्येक तालुक्यातील असणाऱ्या कार्यालयांच्या संख्येच्या प्रमाणात कार्यालयांची निवड केली आहे.

५) कार्यक्रम मालकांच्या उत्पन्नावर वेगवेगळ्या कारणांमुळे जो परिणाम झाला आहे त्याचा या ठिकाणी अभ्यास घेतला नाही.

६) वेगवेगळ्या कारणांचा जो सामाजिक व मानसिक परिणाम लोकांवर व त्यांच्या जीवनावर झाला आहे त्याचा या ठिकाणी अभ्यास करणे शक्य नाही.

❖ संशोधन पद्धती

या विषयाच्या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम दोन्ही स्वरूपाच्या माहितीची आवश्यकता आहे. या संशोधनासाठी सांख्यिकीय व वर्णनात्मक माहितीचा वापर केला जाणार आहे.

अ) प्राथमिक साधनसामग्री

प्राथमिक स्वरूपाची माहिती प्रत्यक्ष मुलाखत व प्रश्नावली या माध्यमातून कार्यालय मालकांकडून किंवा व्यवस्थापकांकडून घेण्यात येणार आहे.

ब) दुय्यम साधनसामग्री

या स्वरूपाची माहिती मिळवण्यासाठी कार्यालयांचे ताळेबंद , नफा-तोटा पत्रक , पावती पुस्तके व इतर नोंदींचा अभ्यास केला जाणार आहे.

❖ नमुना निवड पद्धती

जिल्ह्यातील कार्यालयांची संख्या खूप आहे . त्यामुळे आपल्या अभ्यासासाठी मी प्रत्येक तालुक्यातील जितकी कार्यालय आहेत त्यांच्या प्रमाणात व सांगलीची शहरातील 50 असे नमुना घेतले आहेत . एकूण सर्व मिळून 300 कार्यालय यासाठी घेणार आहे.

❖ प्रकरण योजना

१) प्रकरण पहिले - प्रस्तावना व संशोधन पद्धती

या प्रकरणामध्ये संशोधनाबद्दलची प्रस्तावना , संशोधनाची उद्दिष्टे ,गृहीतके, व्याप्ती , मर्यादा व नमुना गोळा करणे या सर्वांची माहिती दिलेली आहे.

२) प्रकरण दुसरे - संदर्भ साहित्याचा अभ्यास

या प्रकरणांमध्ये संशोधनाबद्दलच्या संपूर्ण संदर्भ साहित्याचा अभ्यास केला आहे.

३) प्रकरण तिसरे - संशोधन विषयाचा अभ्यास

या प्रकरणामध्ये सांगली जिल्ह्यातील कार्यालयांच्या उत्पन्नाचा व त्यावर झालेल्या परिणामांचा आढावा घेतला आहे.

४) प्रकरण चौथे - माहितीचे विश्लेषण व अर्थ लावणे

या प्रकरणामध्ये संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे व त्या माहितीचा अभ्यास करून योग्य अर्थ लावला आहे.

५) प्रकरण पाचवे - पडताळणी व निष्कर्ष

या प्रकरणामध्ये उपसंहार , गृहीतकांची पडताळणी , निष्कर्ष व शिफारशी या सर्व गोष्टी दिलेल्या आहेत.

❖ संशोधन योजना

१) संशोधन साहित्याचे अवलोकन - ० ते ६ महिने

२) माहितीचे संकलन - ७ ते १२ महिने

३) माहितीचे विश्लेषण - १३ ते १८ महीने

४) प्रकरण योजना -१९ ते २४ महिने

५) प्रबंध बांधणी - २५ ते ३० महिने

संशोधक विद्यार्थी,

श्री विनायक शामराव पाटील

मार्गदर्शक,

डॉ. गणेश नारायणराव बोकारे

वाणिज्य विभाग प्रमुख,

नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

औढा, जि. हिंगोली.